प्रेस नोट

विषय :- कोढवां पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि.नं.१८६/१७ सी.आर.पी.सी.१७४ मधील बेवारस मयताचे वारसाचा शोध घेणे बाबत.

---

दि.०१/१२/२०१७ रोजी ठाणे अंमलदार कोढंवा पोलीस स्टेशन पुणे यांना १०१५ वा.चे सुमारास त्यांना खबर देणार सामाजिक कार्यकर्ते श्री नारायण लोंणकर कोढवां पुणे यांनी कळविले की,१०.०० वा चे सुमारास फोनव्दारे कळविले की एन आय बी एम रोड,एम एस ई बी ऑफीस चे बाजुच्या नाल्यातील वाहते पाण्यात एक अनोळखी इसम बेशुध्द अवस्थेत पडलेला आहे.वैगेरे खबर कळालेने लागलीच अग्नीशामक दलास सदर ठिकाणचा पत्ता देवुन त्यांनाही कॉल केला व आंम्ही स्वताहा पोलीस उप निरीक्षक श्री देवकाते व पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन फायर ब्रिगेडच्या मदतीने नाल्या मधील पाण्यात असणा-या इसमास नाल्या बाहेर काढुन त्यास उपचारा करीता ससुन हॉस्पीटल येथे रवाना केले असता एम.एल.सी.नं.२४४२५/१७ दि.०१/१२/२०१७ रोजी १२.१५ वा.डॉक्टरांनी तपासुन तो मयत झाल्याचे घोषीत कले. सदर मयत बॉडीचा दोन पंचासमक्ष इनक्वेस्ट पंचनामा करुन,शव तपासणी फॉर्म भरुन त्याचे मरणाचे निश्चित कारण मिळणे करीता सदरचा मृत देह पोस्ट मार्टेम होणे करीता पाठविला मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यानंतर तो वारसाचा शोध लागे पर्यंत शवागारात ठेवण्यात आला आहे.सदर बाबत कोढवां पोलीस स्टेशन येथे अ.म.र.नं.१८६/१७ सी.आर.पी.सी.१७४ प्रमाणे नोंद घेण्यात आली आहे.

**बेवारस अनोळखी मयताचे वर्णन खालील प्रमाणे**

एक अनोळखी बेवारस मयत पुरुष एन आय बीएम रोड एम एस ई बी ऑफीस चे बाजुच्या नाल्यात मिळून आलेले वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, रंगाने काळा सावळा,उंची ५.६ फुट,चेहरा उभट, दाढी राखलेली,मिशी बारीक, डोकीचे केस वाढलेले ,शरीरयष्टी सडपातळ ,नाक पुढील बाजुस थोडे फुगीर पण सरळ असलेले ,अंगात नेसणीस काळे स्वेटर व पांढरे स्वेटर असलेला याचे डावे हाताचे पोटरीवर सुर्याचे चित्र गोंदलेले व उजवे हाताचे कोपरावर जळालेला (भाजलेला)किंवा /पांढरा जुना डाग असलेला